हरित ऊर्जा निधी (GCF) कार्यक्रमांतर्गत
सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी
निधी वितरित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, उर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१७/प्र.क्र.२६१/ ऊर्जा-७.
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: १९ डिसेंबर,२०१७.

वाचा :-

१.शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक: अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. १८ एप्रिल, २०१७.
२.शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक: अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि. ३० जून, २०१७.
३.महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे यांचे क्रमांक:लेखा/बीपी-०२०/जी.सी.एफ/१७-१८/ २५७०, दिनांक १९/६/२०१७ चे पत्र.

प्रस्तावना :-

महाऊर्जा कार्यालयाने संदर्भाधीन क्र.३ येथील दिनांक १९/६/२०१७ च्या पत्रान्वये " मागणी क्रमांक के-६, २८१०-अपारंपारिक ऊर्जा साधने" याखाली मंजूर असलेल्या तरतूदीतून निधी वितरीत करण्यात यावा, अशी विनंती शासनास केली होती. त्यानुषंगाने, वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक १ व २ च्या परिपत्रकास अनुसरुन, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण(महाऊर्जा) पुणे यांना सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता रु.१५०.०० कोटी इतक्या मंजूर असलेल्या निधीतून, हरित ऊर्जा निधी कार्यक्रमांतर्गत (GCF) कमाल ७०% च्या मर्यादेत रु.८९.४० कोटी इतका निधी वितरीत करावयाची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे यांनी केलेल्या विनंतीनुसार, हरित ऊर्जा निधी कार्यक्रमांतर्गत (GCF) सोबतच्या परिशिष्टात नमूद केलेल्या योजनांच्या / प्रस्तावांच्या अंमलबजावणीसाठी महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण,पुणे यांना रुपये ८९,४०,००,०००/- (रुपये एकोणनव्वद कोटी चाळीस लाख फक्त) इतका निधी वितरित करण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर रक्कम अदा करण्यासाठी श्री.अ.मा.आत्राम, सह सचिव (ऊर्जा), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी व श्री. वि.म.राजूरकर, अवर सचिव, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग मंत्रालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर निधी महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण,पुणे (Director General, Maharashtra Energy Development Agency, Pune) यांच्या नावे अदा करण्यात यावा.

४. अपारंपरिक ऊर्जा साधने अंतर्गत विविध योजनेवरील खर्चाचा, उद्दिष्टे व प्रत्यक्ष साध्यता याबाबतच्या माहितीसह मासिक व त्रैमासिक अहवाल लगतच्या महिन्याच्या १० तारखेपर्यंत सादर करण्यात यावा.

५. या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेल्या निधीची रक्कम केवळ हरित ऊर्जा निधी कार्यक्रमांतर्गत (GCF) विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी खर्च करण्यात येईल याची खातरजमा करण्याची सर्वस्वी जबाबदारी सहाय्यक संचालक (लेखा),महाऊर्जा यांची राहिल.

६. सदर निधीच्या लेख्यासंबंधीची कागदपत्रे, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणाने आवश्यक तेव्हा महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई यांच्याकडे तपासणीसाठी सादर करावीत.

७. याबाबतचा खर्च " मागणी क्रमांक के-६, २८१० अपारंपरिक ऊर्जा साधने,६० इतर, ८०० इतर खर्च, राज्य योजनांतर्गत योजना (००)(०५) महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (२८१० ०१२३), ५० इतर खर्च" या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी मंजूर असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

८. हरित ऊर्जा निधी कार्यक्रमांतर्गत (GCF) सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण यांना निधी वितरीत करताना शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक: अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. १८ एप्रिल, २०१७ च्या परिशिष्टातील अ.क्र. ३ व ९ मधील तपासणी सूचीमधील अटींची व शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक : अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि. ३० जून, २०१७ मधील परि.क्र. ७ ते १८ मधील प्रत्येक अटीची पूर्तता होत आहे.

९. शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : विअप्र-२०१३/प्र क्र ३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७/४/२०१५ च्या परिशिष्टानुसार वित्तीय अधिकार नियमपुस्तिका,१९७८ (भाग-पहिला) (उपविभाग-तीन) तसेच महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका अंतर्गत परिच्छेदांखाली प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारातील भाग पहिला, उप विभाग (तीन), अनुक्रमांक ४, परिच्छेद २७(२) नुसार (अ), योजनेला किंवा प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता देणे (वित्तीय मंजूरी धरुन) याबाबतचे अनावर्ती खर्चाच्या रु.५ कोटी किंवा आवर्ती खर्चाच्या बाबतीत वार्षिक रु.५० लक्ष पर्यंत मंजूरी देण्याचे पूर्णपणे अधिकार,सदर प्रपत्राच्या रकाना (६) मध्ये नमूद केलेल्या अटींच्या अधिनतेने, मंत्रालयीन प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेले आहेत.

१०. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक: अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. १८ एप्रिल, २०१७ व शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक: अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि. ३० जून, २०१७ च्या परिपत्रकातील तरतुदीनुसार तसेच शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : विअप्र-२०१३/प्र क्र ३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७/४/२०१५ च्या परिशिष्टानुसार वित्तीय अधिकार नियमपुस्तिका,१९७८ (भाग-पहिला) (उपविभाग-तीन) तसेच महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका अंतर्गत परिच्छेदांखाली प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारातील भाग पहिला, उप विभाग (तीन), अनुक्रमांक ४, परिच्छेद २७(२) नुसार (अ), विभागांना दिलेल्या अधिकारीतेत निर्गमित करण्यात येत आहे.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेताक २०१७१२२००९५८०३००१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Prashant Pundalik Badgeri

Digitally signed by Prashant Pundalik Badgeri
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy And Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ae61ab0caff4e0f24ac492ed7902d55ccf49e93124a5c1327133a6da9db8c748, serialNumber=ec955e2d360e1fddb6abac58a907419053beeceb5dbac48a78c89c588ff71bef, cn=Prashant Pundalik Badgeri
Date: 2017.12.20 10:09:17 +05'30'

(प्र पु.बडगेरी)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१.महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे म्हाडा कमर्शियल कॅाम्प्लेक्स, सर्व्हे नं. १९१-ए- फेज, येरवडा, पुणे- ४११ ००६.
२.महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा व अनुज्ञेयता /लेखा परीक्षा),मुंबई- ४०० ००१
३.महालेखापाल, महाराष्ट्र-२,(लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा),नागपूर
४.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

५.वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
६.नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
७.आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
८.अवर सचिव(रोख/प्रशासन), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,मंत्रालय,मुंबई.३२
९.अवर सचिव(ऊर्जा-३), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१०.निवड नस्ती, ऊर्जा-७

परिशिष्ट

१.सहवीज निर्मिती प्रकल्प

हरित ऊर्जा निधी अंतर्गत वित्त वर्ष २०१७-१८ प्राधान्यक्रम यादी (रु.लक्ष मध्ये)

अ.क्र	प्रकल्पाचे नांव	क्षमता (मे.वॅ.)	प्रकल्प कार्यान्वित तेचा दिनांक	प्रस्ताव प्राप्त दिनांक	निष्कासन व्यवस्था खर्च रु.(लक्ष मध्ये)	भांडवली अनुदान रु. (लक्ष मध्ये)	एकूण रु. (लक्ष मध्ये)
१	मे. गंगामाई इंडस्ट्रीज ॲन्ड कन्स्ट्रक्शन्स लि. जि. अहमदनगर	३२.०	०५-१२-२०११	०९-०३-२०१७	१०.४९	०.००	१०.४९
२	मे. जागृती शुगर ॲन्ड अलाईड इंडस्ट्रीज लि. लातूर	१२.३	१४-१२-२०११	२७-०२-२०१७	०.००	१००.००	१००.००
३	मे. जागृती शुगर ॲन्ड अलाईड इंडस्ट्रीज लि. लातूर	१२.३	१४-१२-२०११	२७-०२-२०१७	२००.००	०.००	२००.००
४	मे. अशोक सहकारी साखर कारखाना लि., जि. अहमदनगर	१५.०	१२-११-२०१३	०७-०९-२०१६	११५.४८	१००.००	२१५.४८
५	मे. विजय शुगर (डिव्हीजन) ऑफ शिवरत्न उद्योग लि.,) जि. सोलापूर	१२.५	०४-०२-२०१५	२७-०१-२०१७	०.००	१००.००	१००.००
६	मे. पूर्णा सहकारी साखर कारखाना लि., बसमतनगर, जि. हिंगोली	१८.०	२६-०६-२०११	१३-१२-२०१६	२००.००	१००.००	३००.००
७	मे. येडेश्वरी ॲग्रो प्रोडक्टस् लि. आनंदगाव (सारणी) ता. केज, जि. बीड	१०.०	१७-०१-२०१४	१३-१२-२०१६	११०.१२	१००.००	२१०.१२
८	मे. कुकडी सहकारी साखर कारखाना लि, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर	१२.०	३०-११-२०१३	१४-०३-२०१७	२००.००	१००.००	३००.००

९	मे. युटपियन शुगर्स प्रा.लि, जि.सोलापूर	१४.८	१२-११-२०१४	०८-०६-२०१७	२००.००	१००.००	३००.००
१०	मे. वसंतरावदादा पाटील सहकारी साखर कारखाना लि., जि. नाशीक	१७	८-०२-२०१२	२८-०५-२०१२	२००.००	१००.००	३००.००
११	मे. दुधगंगा-वेदगंगा सहकारी साखर कारखाना लि., जि. कोल्हापूर	२०	९-०२-२०१२	१०-०१-२०१३	२००.००	१००.००	३००.००
१२	मे. अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना (मे. रेणुका शुगर्स), जि. सातारा	१५	२-११-२०१२	०१-०१-२०१५	२००.००	१००.००	३००.००
१३	मे.सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना लि. अहमदनगर	३०	४-०४-२०१६	२४-११-२०१७	२००.००	१००.००	३००.००
१४	मे.सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखाना लि., सोलापूर	१८	७-०१-२०१७	२४-११-२०१७	२००.००	१००.००	३००.००
१५	मे.व्दारकाधीश साखर कारखाना लि, नाशिक	१३	५-११-२०१४	२४-११-२०१७	२००.००	१००.००	३००.००
१६	मे.उदगीरी शुगर ॲन्ड पॉवर लि., सांगली	१४	३-०३-२०१३	१६-०३-२०१६	२००.००	१००.००	३००.००
१७	मे. सर सेनापती संताजी घोरपडे शुगर फॅक्टरी लि. जि. कोल्हापूर	२२	९-१२-२०१४	०१-०९-२०१७	२००.००	१००.००	३००.००
		२८७.९		**एकूण -**	**२६३६.०९**	**१५००.००**	**४१३६.०९**

२. कृषि अवशेषांवर आधारीत वीज निर्मिती प्रकल्प

हरित ऊर्जा निधी अंतर्गत वित्त वर्ष २०१७-१८ प्राधान्यक्रम यादी (रुपये लक्षमध्ये)

अ. क्र.	प्रकल्पाचे नांव	क्षमता (मे.वॅ.)	प्रकल्प कार्यान्विततेचा दिनांक	प्रस्ताव प्राप्त दिनांक	निष्कासन व्यवस्था खर्च रु. (लक्ष मध्ये)
१	मे.स्पार्क ग्रीन एनर्जी प्रा.लि, अहमदनगर	२५	०६-०१-२०१६	-	२००.००
२	मे. साईनव्हेव पॉवर लि, सांगली	१०	२७-०१-२०१४	२६-०४-२०१७	२००.००
		३५			**४००.००**

३. लघुजल विद्युत निर्मिती प्रकल्प

हरित ऊर्जा निधी अंतर्गत वित्त वर्ष २०१७-१८ प्राधान्यक्रम यादी (रुपये लक्षमध्ये)

अ. क्र.	प्रकल्पाचे नांव	क्षमता (मे.वॅ.)	प्रकल्प कार्यान्वि ततेचा दिनांक	प्रस्ताव प्राप्त दिनांक	निष्कासन व्यवस्था खर्च रु. (लक्ष मध्ये)	भांडवली अनुदान रु. (लक्ष मध्ये)	एकूण रु. (लक्ष मध्ये)
१	मे. एसएमएस विद्युत प्रा.लि.मौजे नवेगांव खैरे, ता.पारशिवनी, जि.नागपूर येथील पेंच-कामटी खैरे डावा कालवा (एलबीसी.)	४.४	२९-१-२०१५	१८-०९-२०१७	५५.००	१५०.००	२०५.००
२	मे. श्री. तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी नवशक्ती निर्माण संस्था प्रा. लि, वारणानगर ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर (पाटगाव)	२.५	१७-२-२०१२	०१-०४-२०१७	५५.००	०	५५.००
३	मे. श्री. तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी नवशक्ती निर्माण संस्था लि, मौजे कडवी, ता.शाहूवाडी, जि. कोल्हापूर (कडवी)	१.५	१४-२-२०१२	०१-०४-२०१७	५५.००	०	५५.००
४	मे. अशोका स्थापत्य प्रा.लि., गुंजावणी, ता.वेल्हे, जि. पुणे	२.०	१५-१२-२०१६	०७-११-२०१७	५५.००	१५०.००	२०५.००
	एकूण	१०.४			**२२०.००**	**३००.००**	**५२०.००**

४. लघुजल विद्युत निर्मिती प्रकल्प

हरित ऊर्जा निधी अंतर्गत वित्त वर्ष २०१७-१८ प्राधान्यक्रम यादी (रुपये लक्षमध्ये)

अ. क्र.	प्रकल्पाचे नांव	क्षमता (मे.वॅ.)	प्रकल्प कार्यान्वितचा दिनांक	प्रस्ताव प्राप्त दिनांक	निष्कासन व्यवस्था खर्च रु. (लक्ष मध्ये)	भांडवली अनुदान रु. (लक्ष मध्ये)	एकूण रु. (लक्ष मध्ये)
१	मे. एसएमएस विद्युत प्रा.लि.मौजे नवेगांव खैरे, ता.पारशिवनी, जि.नागपूर येथील पेंच-कामटी खैरे डावा कालवा (एलबीसी.)	४.४	२९-१-२०१५	१८-०९-२०१७	५५.००	१५०.००	२०५.००
२	मे. श्री. तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी नवशक्ती निर्माण संस्था प्रा. लि, वारणानगर ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर (पाटगाव)	२.५	१७-०२-२०१२	०१-०४-२०१७	५५.००	०	५५.००
३	मे. श्री. तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी नवशक्ती निर्माण संस्था लि, मौजे कडवी, ता.शाहूवाडी, जि. कोल्हापूर (कडवी)	१.५	०१४-२-२०१२	०१-०४-२०१७	५५.००	०	५५.००
४	मे. अशोका स्थापत्य प्रा.लि., गुंजावणी, ता.वेल्हे, जि. पुणे	२.०	१५-१२-२०१६	०७-११-२०१७	५५.००	१५०.००	२०५.००
	एकूण	**१०.४**			**२२०.००**	**३००.००**	**५२०.००**

५. रस्ते दुरुस्ती

अ) सन २०१७-१८ मध्ये हरितऊर्जा निधी मधून प्रस्तावित रस्ते दुरुस्तीसाठी लागणारा खर्च खालील प्रमाणे (रुपये लक्षमध्ये)

अ. क्र.	सा. बां. मंडळ	कार्यान्वयन यंत्रणा/ कार्यान्वयन अधिकारी	अंदाजपत्रकांची / कामांची संख्या परिशिष्ट - अ,ब व क नुसार			समितीने शिफारस केलेली अंदाजपत्रकीय किंमत (रु .लाखात)
			अ	ब	क	
१	सातारा	का. अ., सा. बां. (प.) विभाग, सातारा	५	२	६	१६७०.४९०५
२	धुळे	का. अ., सा. बां. विभाग, धुळे	४			३९८.४०४५४
		का. अ., सा. बां. विभाग, नंदुरबार	७	९		१६७८.६९३३७
३	नाशिक	का. अ., सा. बां. विभाग, नाशिक	११	४		३५९३.५

४	कोल्हापूर	का. अ., सा. बां. (प.) विभाग, सांगली	४५			४१३०.०५३०८
	सातारा	का. अ., सा. बां. विभाग, सातारा		१२	१५	१७८२.१८०९२
	कोल्हापूर	कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग कोल्हापूर		३		४००.००
	कोल्हापूर	का. अ., सा. बां. (दक्षिण) विभाग, कोल्हापूर	६			३७५.५९६४१
		एकूण	**७८**	**३०**	**२१**	**१४०२८.९१८८२**

ब) हरितऊर्जा निधी मधून प्रस्तावित रस्ते दुरुस्तीसाठी अदा केलेल्या एकूण रकमेपैकी उर्वरित १५ टक्के रक्कम रु. १०.७७ कोटी रकमेचा तपशिल खालीलप्रमाणे रु. लक्षमध्ये

क्र	सा. बां. मंडळ	सार्वजनिक बांधकाम विभाग	एकूण रस्ते / (अंदाज पत्रके)	तांत्रिक मान्यतेची (T.S.) अंदाजपत्रकीय किंमत	वितरित केलेली एकूण रक्कम ८५ टक्के	प्रस्तावित रक्कम १५ टक्के
१	सातारा (जि. सातारा)	कार्यकारी अभियंता, सा. बां. (प.) विभाग सातारा	७(७)	१५२५.२८२४	१२९६.४९	२२८.८
२	सातारा (जि. सातारा)	कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग सातारा	१(१)	१०८.६४६२३	९२.३४९२९६	१६.३
३	कोल्हापूर (जि. सांगली)	कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग मिरज	२२(२५)	२०४८.१४३७	१७४०.९२२१	३०७.२
४	कोल्हापूर (जि. सांगली)	कार्यकारी अभियंता, सा. बां. (पश्चिम) विभाग सांगली	१७(१९)	१३२१.०२८	११२२.८७३८	१९८.२
५	धुळे (जि. नंदुरबार)	कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग नंदुरबार	११(११)	३९५.९६६५८	३३६.५७१५९	५९.३९
	धुळे (जि. धुळे)	कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग धुळे	२३(२४)	१७८२.०७९९४	१५१४.७६७९	२६७.३
		एकूण	**८१ (८७)**	**७१८१.१४६८५**	**६१०३.९७४६८६**	**१०७७.१९**

टीप :- महाऊर्जा कार्यालयाने प्रत्येक रस्त्याचा खर्च रु.५.०० कोटीपेक्षा कमी असल्याचे नमूद केले असून एकूण रस्ते दुरुस्तीचा खर्च वरील विवरणपत्रात नमूद केला आहे. महाऊर्जा कार्यालयाने प्रस्तावित केलेल्या उपरोक्त यादीतील प्रस्तावांना वर नमूद केलेल्या शासन निर्णयातील अटी व शर्तींच्या अधिनतेने मागणी केलेल्या निधीच्या मर्यादेत निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.